लोकमत

कोल्हापूर, शनिवार, दि. ३० एप्रिल २०२२ IV

शाहू छत्रपती : स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतर्फे आयोजित जन्मशताब्दी महोत्सवाची सांगता

# शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे यांनी बहुजन समाजाचे विद्यार्थी घडवले

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी बहुजन विद्यार्थ्यांसाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेच्या माध्यमातून शिक्षणाची दारे खुली करून समाजात समतेचा विचार वाढविला. ही संस्था स्वामी विवेकानंद आणि बापूजींच्या विचारांनी भविष्यातील जबाबदार नागरिक घडविण्याचे महत्त्वपूर्ण काम करत आहे, असे प्रतिपादन शाहू छत्रपती यांनी शुक्रवारी येथे केले.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाच्या सांगता समारंभावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. विवेकानंद महाविद्यालयाच्या प्रांगणातील या कार्यक्रमास श्री स्वामी विवेकानंद. शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष आमदार चंद्रकांत पाटील, कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे प्रमुख उपस्थित होते. शाहू छत्रपती म्हणाले, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यासह बापूजींनी बहुजन विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. बापूजींनी स्थापन केलेल्या संस्थेच्या नावावरून त्यांच्या कार्याची दिशा, विचार लक्षात येतात. आमदार चंद्रकांत पाटील म्हणाले, संस्थेने बापूजींचे विचार पुढे नेणारे विविध उपक्रम राबवावेत. कौशल्य विकास काळाची गरज आहे. त्यादृष्टीने आणि जिल्ह्याच्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थी घडविण्याचे काम करावे.



**कोल्हापुरात शुक्रवारी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाच्या सांगता समारंभावेळी शाहू छत्रपती यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून अभयकुमार साळुंखे, लालासाहेब यादव, राजेंद्र शेजवळ उपस्थित होते.**

## सर्वसमावेश बंधुत्व हेच हिंदुत्व

स्वामी विवेकानंद यांनी शिकागो येथे सर्वांना बंधू आणि भगिनी संबोधून आपलेसे केले. त्यांचे हिंदुत्व सर्वांना सोबत घेऊन जाणारे होते. सध्या वेगळेच हिंदुत्व सांगितले जात आहे. सर्वसमावेश बंधुत्व हेच हिंदुत्व हे सर्वांनी लक्षात घ्यावे, असे शाहू छत्रपती यांनी सांगितले.

## सर्वोत्कृष्ट शाखा, शाळांचा केला सन्मान

या कार्यक्रमात प्रमुख उपस्थितांच्या हस्ते संस्थेच्या सर्वोत्कृष्ट शाखा आणि स्वच्छ सुंदर गुणवत्तेच्या शाळांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यात न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल (कोल्हापूर), गुरुवर्य अ. आ. देसाई माध्यमिक विद्यामंदिर, म्हापूसकर आटर्स, कॉमर्स ज्युनिअर कॉलेज हातखंबा (रत्नागिरी), स्वामी रामानंद भारती विद्यामंदिर (तासगाव, सांगली), आदर्श विद्यामंदिर विंग (कराड), पुरंदर हायस्कूल (सासवड, पुणे), महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हायस्कूल (तुळजापूर), श्रमजीवी जनता विद्यामंदिर (पोशीर, रायगड). नेताजी सुभाष विद्यालय (कित्तुर), पृथ्वीराज कपूर मेमोरियल हायस्कूल (लोणी काळभोर) यांचा समावेश आहे.

या कार्यक्रमात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दीमहोत्सव स्मरणिका, अर्चना पानारी यांचा परिसस्पर्श, प्रा. विनोदकुमार वायचळ यांनी हिंदीत अनुवादित केलेला शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे (व्यक्तित्व एवं कार्य) आणि प्रा. मच्छिंद्र नांगरे यांचा डॉ. बापूजी साळुंखे आणि मराठवाडा या ग्रंथांचे प्रकाशन प्रमुख उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. खासदार संजय पाटील, संस्थेचे सहसचिव एस. एम. गवळी, लालासाहेब गायकवाड, नामदेवराव कांबळे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार आदी उपस्थित होते. शाहीर आझाद नायकवडी यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जीवनावर आधारित स्वरचित पोवाडा सादर केला. प्रा. महेश हिरेमठ यांनी भक्तिगीते सादर केली. महोत्सव समितीचे सचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ यांनी जन्मशताब्दी महोत्सवातील उपक्रमांचा आढावा सादर केला. केंद्र शासनाने बापूजींना पद्म पुरस्काराने सन्मानित करावे, अशी भावना व्यक्त केली. शुभदा हिरेमठ, महेश गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांनी आभार मानले.

पुण्य नगरी ३

शनिवार, ३० एप्रिल २०२२

# संवेदनशील समाजनिर्मितीत बापूजींचे भरीव योगदान

## अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सव सांगता समारंभ उत्साहात

कोल्हापूर : प्रतिनिधी

राष्ट्र, समाज व आई-वडिलांप्रती कृतज्ञता असायला हवी. आदर्श शिक्षक कसा असावा, याचा वस्तुपाठ शिक्षणमहर्षी डॉ. बापूजींच्या तत्त्वज्ञानातून, कार्यातून आणि विचारातून प्रतीत होतो, असे उद्‌गार कणेरी मठाचे मठाधिपती अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज यांनी काढले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सवाच्या सांगता समारंभाच्या निमित्ताने ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी श्रीमंत शाहू छत्रपती महाराज होते.



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी महोत्सव सांगता समारंभात बोलताना अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज. सोबत श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, अध्यक्ष चंद्रकांत पाटील, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे व संस्था पदाधिकारी. (छाया : अर्जुन टाकळकर)

प्रास्ताविक संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सव स्मरणिका, अर्चना पानारी यांचा परिसस्पर्श, डॉ. विनोदकुमार वायचळ यांनी हिंदीत अनुवादित केलेला शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे (व्यक्तित्व एवं कार्य) आणि डॉ. मच्छिंद्र नांगरे यांचा डॉ. बापूजी साळुंखे आणि मराठवाडा या ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. संस्थेतील नऊ शाळांना सर्वोत्कृष्ट शाखा व स्वच्छ सुंदर गुणवत्तेची शाळा पुरस्कार देण्यात आले.

प्रारंभ शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा पूजन व संस्था प्रार्थनेने झाला. प्रा. महेश हिरेमठ यांनी भक्तिगीते सादर केली. शाहीर आझाद नायकवडी यांनी शिक्षणमहर्षी डॉ. साळुंखे यांच्या जीवनावर आधारित स्वरचित पोवाडा सादर केला. आभार सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे यांनी मानले. सूत्रसंचालन शुभदा हिरेमठ व प्रा. महेश गायकवाड यांनी केले.

यावेळी संस्थेचे सहसचिव (अर्थ) एस. एम. गवळी, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्यासह संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी व १३ जिल्ह्यांतील ४०६ शाखांतील गुरुदेव कार्यकर्ते उपस्थित होते.

### पद्म पुरस्काराने सन्मान व्हावा

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य प्रेरणादायी आहे. त्याची दखल घेऊन केंद्र शासनाने बापूजींना पद्म पुरस्काराने सन्मानित करावे, अशी भावना महोत्सव समितीचे सचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ यांनी व्यक्त केली.

Dod



कोल्हापूर : जन्मशताब्दी महोत्सवात बोलताना काडसिद्धेश्वर महाराज. व्यासपीठावर एस. एम. गवळी, शुभांगी गावडे, शाहू महाराज, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, लालासाहेब यादव, प्राचार्य राजेंद्र शेजवळ आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच नीतिमूल्यांना महत्त्व द्या : काडसिद्धेश्वर महाराज

## शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सवाची सांगता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डीजिटल युगात शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच शिक्षकांनी नितिमूल्यांना महत्त्व दिल्यास आदर्श विद्यार्थी घडवता येईल, असे प्रतिपादन अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज यांनी केले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सवाच्या सांगता समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शाहू महाराज होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष भाजपचे प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

काडसिद्धेश्वर महाराज म्हणाले, बापूजी साळुंखे यांनीही शिक्षणात दूरदृष्टी ठेवून विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबरच जगण्याचा आदर्श वास्तुपाठ घालून दिला. त्यांच्या विचारांचे आचरण करूनच विवेकानंद शिक्षण संस्था मार्गक्रमण करत आहे. आदर्श शिक्षक कसा असावा, याचा वस्तुपाठ शिक्षणमहर्षी डॉ. बापूजींच्या तत्त्वज्ञानातून, कार्यातून आणि विचारातून व्यक्त होत आहे.

आ. चंद्रकांत पाटील म्हणाले, बदलत्या शिक्षण प्रणालीबरोबरच कौशल्य विकासावर आधारित अभ्यासक्रम सुरू केल्यास रोजगाराच्या नवनवीन संधी मिळू शकतात.

शाहू महाराज म्हणाले, समाजात जबाबदार नागरिक घडविण्यासाठी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी तळागाळात शिक्षणाचीगंगापोहोचवली. समाजसुधारकांच्या मूल्यांचा आदर्श ठेवून संस्थेने कार्य करावे. प्रास्ताविकात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार' या हेतूने शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली.

प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ यांनी जन्मशताब्दी समितीच्या अहवालाचे वाचन केले. केंद्र शासनाने बापूजींना पद्म पुरस्कारानेसन्मानितकरावे, अशीभावना व्यक्त केली. याप्रसंगी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सव स्मरणिकांचे प्रकाशन करण्यात आले. शाहीर आझाद नायकवडी यांनी पोवाडा सादर केला. संस्थेच्या सचिव प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांनी आभार मानले. सौ. शुभदा हिरेमठ व प्रा. महेश गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले.

सकाळ

शनिवार,
३० एप्रिल २०२२

# कृतज्ञता, संवेदनशीलता हाच शिक्षणाचा गाभा

## अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज; शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी समारंभाची सांगता

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : देश, समाज यांच्याप्रती कृतज्ञता आणि मनाची संवेदनशीलता निर्माण होणे हाच शिक्षणाचा गाभा आहे. यासाठी विद्यार्थ्यांना दर्शनशास्त्र आणि नीतिमूल्यांचे शिक्षण दिले पाहिजे. विद्यार्थ्यांमधील अवगुण दूर करणे हेच शिक्षकाचे काम असून, त्यांच्यावर उत्तम नागरिक बनवण्याची जबाबदारी आहे, असे मत अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज यांनी व्यक्त केले. शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे जन्मशताब्दी सांगता समारंभप्रसंगी आज ते बोलत होते. विवेकानंद महाविद्यालयाच्या प्रांगणात हा कार्यक्रम झाला. श्रीमंत शाहू छत्रपती महाराज अध्यक्षस्थानी होते.

सुरुवातीला महेश हिरेमठ आणि सहकाऱ्यांनी संस्थेची प्रार्थना आणि भजन सादर केले. त्यानंतर बापूजी साळुंखेंच्या जीवनावरील पोवाडा आझाद नायकवडी यांनी गायला. प्रास्ताविक श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी केले. संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी जन्मशताब्दी महोत्सवादरम्यान घेतलेल्या उपक्रमांचा आढावा घेतला. संस्थाध्यक्ष आमदार चंद्रकांत पाटील म्हणाले, की कौशल्य विकास ही काळाची गरज आहे. येथून पुढे रोजगार आणि व्यवसाय करण्यासाठी कौशल्याची गरज असणार आहे.

### सर्वांना बरोबर घेऊन जाणारे हिंदुत्व

अध्यक्षीय भाषणात श्रीमंत शाहू छत्रपती महाराज म्हणाले, की बापूजी साळुंखे यांनी संस्थेचे नाव स्वामी विवेकानंद ठेवले. यावरून त्यांच्या कार्याची दिशा आणि त्यांचे विचार काय होते, हे लक्षात येते. विवेकानंदांनी शिकागो येथे सर्वांना बंधू आणि भगिनी संबोधून आपलेसे केले. त्यांचे हिंदुत्व सर्वांना बरोबर घेऊन जाणारे होते. आज वेगळेच हिंदुत्व सांगितले जाते. बहुजनांच्या मुलांना शिक्षण मिळण्यासाठी सुरू केलेल्या या संस्थेने समाजातील समतेचा विचार अधिक बळकट केला.

विवेकानंद संस्थेने याचा विचार करून नवे अभ्यासक्रम सुरू केले पाहिजेत. तसेच समाजात कौशल्याला प्रतिष्ठा मिळवून दिली पाहिजे. काडसिद्धेश्वर महाराज म्हणाले, की ब्रिटिशांनी १८३६ मध्ये देशातील सात लाख गुरुकुले बंद केली. त्यामुळे येथील शिक्षण आणि संशोधन थांबले. घरोघरी चालणारे कुटिरोद्योग बंद झाले. त्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये असणारी पिढी संपली. आधुनिक शिक्षणाच्या नावाखाली ज्या शाळा सुरू केल्या त्यातून आमच्या पिढ्या या कौशल्यहीन आणि आत्मकेंद्री बनल्या. यामुळे समाजाची अवनती झाली.

संस्थेच्या सचिव शुभांगी गावडे, लालासाहेब गायकवाड, एस. एम. गवळी, नामदेवराव कांबळे, खासदार संजय पाटील, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, हितेंद्र साळुंखे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जन्मशताब्दी सांगताप्रसंगी बोलताना अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज. डावीकडून एस. एम. गवळी, नामदेवराव कांबळे, शुभांगी गावडे, आमदार चंद्रकांत पाटील, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, अभयकुमार साळुंखे, लालासाहेब यादव, डॉ. आर. व्ही. शेजवळ. (नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

तरुण भारत   शनिवार, ३० एप्रिल २०२२

# शिक्षण क्षेत्रात डॉ. बापूजींचे भरीव योगदान

## अदृश्य काडसिध्देश्वर महाराजांचे प्रतिपादन : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशमाब्दी सांगता कार्यक्रम

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

आदर्श शिक्षक कसा असावा, याचा वस्तुपाठ शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखें यांच्या तत्वज्ञानातून, कार्य अन् विचारातून प्रतीत होतो, असे प्रतिपादन कणेरीचे मठाधिपती अदृश्य काडसिध्देशवर महाराज यांनी केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सवाची सांगता शुक्रवारी ताराबाई पार्क येथील संस्थेच्या प्रांगणात झाली. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी श्रीमंत शाहू छत्रपती होते.



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी सांगता प्रसंगी बोलताना अदृश्य काडसिध्देश्वर महाराज. शेजारी प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ, लालासाहेब यादव, प्राचार्य अभयकुमार साळुंखे, श्रीमंत शाहू छत्रपती, चंद्रकांत पाटील, प्राचार्या गावडे.

श्रीमंत शाहू छत्रपती म्हणाले, समाजसुधारकांनी समाजामध्ये जी मूल्ये रुजवली त्या मूल्यांना आदर्श ठेवून जबाबदार नागरिक घडवण्यासाठी शिक्षणमहर्षी डॉ. साळुंखे यांनी शिक्षणाची गंगा पोहोचवली आहे.

प्रास्ताविकात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार या उदात्त हेतूने डॉ. बापूजी साळुंखे यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्यामुळे संस्थेतून तयार झालेले विद्यार्थी विविध क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत. बापूजी ध्येयवादी शिक्षक होते. त्यांच्या कार्याचे योगदान शिक्षणक्षेत्रात सुवर्णाक्षरानी लिहिले जावे, असे त्यांनी सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी आजच्या युगात कौशल्याधारित शिक्षणाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. डॉ. साळुंखे जन्मशताब्दी महोत्सव समितीचे सचिव, प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ यानी जन्मशताब्दी समितीच्या अहवालाचे वाचन केले. डॉ. साळुंखे यांच्या शैक्षणिक, सामाजिक कार्याची दखल घेऊन केंद्राने बापूजींना पद्म पुरस्काराने सन्मानित करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

शिक्षणमहर्षी डॉ. साळुंखे जन्मशताब्दी महोत्सव स्मरणिका, अर्चना पानारी यांचा परिसस्पर्श, डॉ. विनोदकुमार वायचळ यांनी हिंदीत अनुवादित केलेला शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे (व्यक्तित्व एवं कार्य) आणि डॉ. मच्छिंद्र नांगरे यांचा डॉ. बापूजी साळुंखे आणि मराठवाडा या ग्रंथांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. संस्थेतील ९ शाळांना सर्वोत्कृष्ठ शाखा व स्वच्छ सुंदर गुणवत्तेची शाळा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठ परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि आप्पासाहेब पवार यांच्या पुतळयांना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. शिक्षणमहर्षी डॉ. साळुंखे, संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाला प्रारंभ झाला. शाहीर आझाद नायकवडी यांनी डॉ. बापूजी साळुंखेंच्या जीवनावर पोवाडा सादर केला. सौ. शुभदा हिरेमठ, प्रा. महेश गायकवाड यांनी सुत्रसंचालन केले. संस्थेच्या सेक्रेटरी, प्राचार्या शुभांगी गावडे यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे सहसचिव एस. एम. गवळी, आजी–माजी पदाधिकारी, १३ जिल्ह्यातील ४०६ शाखांतील कार्यकर्ते उपस्थित होते.